महाराष्ट्रात 'ॲनालॉग पनीर'वर वर्षभराची बंदी >>पान 2

नितीन गडकरींना हायकोर्टाचा मोठा दिलासा, ई २० शी संबंधित सर्व डिपफेक मजकूर तत्काळ हटवण्याचे आदेश जारी >>पान 3

सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना १० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याची संधी >>पान 4

सुविचार
मोठं व्हायचं असेल तर छोट्या गोष्टी शिकाव्या लागतात.

दैनिक
आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 22 ■ गुरूवार, दि. 06 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

घटस्फोटाच्या २१ दिवसांनी उर्मिला कानेटकरची क्रिप्टिक पोस्ट; कुणाचंही नाव न घेता लिहिलंय, कर्मा...

आतील पान

गतिमान भूसंपादन करून औद्योगिक विकासाला चालना द्यावी - मुख्यमंत्री फडणवीस

मुख्यमंत्र्यांकडून एमआयडीसीअंतर्गत प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

मुंबई। प्रतिनिधी : राज्यामध्ये नवीन औद्योगिक वसाहतींचा विस्तार वेगाने होत आहे. या विस्तारातूनच औद्योगिक विकास होणार आहे. त्यामुळे उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. गतिमान भूसंपादन करून महाराष्ट्रात औद्योगिक विकासाला चालना द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एमआयडीसीअंतर्गत विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासंदर्भात आढावा बैठक वर्षा निवासस्थान येथे झाली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, यांच्यासह संबंधित विविध वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, औद्योगिक भूखंड वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी 'मिलाप' या ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज, रिअल-टाईम ट्रॅकिंग, ऑफर लेटर आणि वाटप आदेशांचे स्वयंचलित वितरण; तसेच डॅशबोर्ड सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राज्यात १,१८३ औद्योगिक भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. त्यातून ५,५०२ कोटींचा महसूल प्राप्त झाला आहे.

राज्यात सध्या ६६ हजार ३४३ एकर जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, पुणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, नाशिक आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये ही प्रक्रिया सुरू आहे. राज्यातील ९७ सामंजस्य करारांतर्गत सुमारे ७५ हजार २३४ एकर जमिनीची मागणी आहे. त्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उच्चाधिकार समिती स्तरावरील मंजुरी, विविध प्रशासकीय टप्पे; तसेच वनविषयक परवानग्यांमुळे होणारा विलंब कमी करण्यासाठी प्रक्रिया अधिक सुलभ करावी. उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध व्हावी आणि गुंतवणूक प्रकल्पांना गती मिळावी, यासाठी अनावश्यक प्रशासकीय टप्पे कमी करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

प्रकल्पाचे स्वरूप आणि गुंतवणुकीच्या प्रमाणानुसार भूखंड विकासासाठी निश्चित कालमर्यादा ठरवण्यात यावी. निर्धारित मुदतीत बांधकाम सुरू करणे बंधनकारक राहणार असून, विकासात विलंब झाल्यास टप्प्याटप्प्याने दंड आकारणे; तसेच आवश्यकतेनुसार भूखंड पुन्हा ताब्यात घेण्याची तरतूदही प्रस्तावित करावी. औद्योगिक जमिनीच्या वापरात सुसूत्रता आणि कार्यक्षमता आणण्यासाठी देश-विदेशातील सर्वोत्तम पद्धती; तसेच इतर राज्यांतील धोरणांचा अभ्यास करून नवीन जमीन वाटप निकष निश्चित करावे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

बैठकीत औद्योगिक भूखंड वाटप, अविकसित भूखंडांचे पुनर्विकसन, भूखंड वाटपातील धोरणात्मक सुधारणा, भूखंडांचे तर्कसंगतीकरण तसेच औद्योगिक प्रकल्पांसाठी जमीन संपादनाच्या कामांचा आढावा घेण्यात आला. 'एमआयडीसी'च्या वतीने विविध ठिकाणी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या सद्यस्थितीबाबत सादरीकरणाद्वारे यावेळी माहिती देण्यात आली.

सोशल मीडियावरील मैत्री ठरली घातक, नागपूरची बेपत्ता अल्पवयीन मुलगी रक्ताच्या थारोळ्यात सापडली; ठाण्याचा तरुण अटकेत

दैनिक आपला विदर्भ

नागपूर । प्रतिनिधी : नागपूरच्या हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून २ ऑगस्ट रोजी बेपत्ता झालेली अल्पवयीन मुलगी अखेर सापडली आहे. ती नागपूरमधीलच दिघोरी भागातील एका खोलीत अत्यंत गंभीर जखमी अवस्थेत आढळून आली. पीडित मुलीच्या शरीरावर मारहाणीच्या अनेक गंभीर खुणा असून तिच्या हातावर धारदार शस्त्रानं वार केल्याच्या अनेक जखमा आढळून आल्या आहेत.

पोलिसांनी या प्रकरणी १९ वर्षीय निर्भय उर्फ आकाश पाखरे याला अटक केली आहे. आरोपी आकाश हा ठाणे (मुंबई) येथील रहिवासी आहे. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध अपहरण आणि इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. या धक्कादायक घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून हुडकेश्वर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

एकनाथ शिंदेंचे सर्व आमदार अपात्र होणार! सुप्रीम कोर्टातील सुनावणीनंतर सर्वात मोठा दावा

दैनिक आपला विदर्भ

मुंबई। प्रतिनिधी : शिवसेना नाव आणि चिन्हासंदर्भात सुप्रीम कोर्टात आज सुनावणी पार पडली असून, यावेळी उद्धव ठाकरेंच्या वतीने कपिल सिब्बल यांनी बाजू मांडत संपूर्ण घटनाक्रम मांडला. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने दाखल केलेल्या २०२४ मधील याचिकेवर आज सुनावणी झाली. याचिकेत, राज्यघटनेच्या १० व्या अनुसूचीनुसार शिंदेंच्या शिवसेना गटाच्या आमदारांना अपात्र ठरवण्यास महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या नकाराला आव्हान देण्यात आलं. यासोबतच, एकनाथ शिंदे गटाला अधिकृत शिवसेना म्हणून मान्यता देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरही सुनावणी झाली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली,

घटनेतील दहावी अनुसूची आणि परिच्छेद २ नुसार सगळे अपात्र, बरखास्त होतील असा दावा शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला आहे. सुनावणीनंतर माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले की, ''प्रत्येक कृती बेकायदेशीर आहे. घटनेतील दहावी अनुसूची आणि परिच्छेद २ नुसार सगळे अपात्र, बरखास्त होतील. निवडणूक आयोगाने शिवसेनेचे चिन्ह आणि मूळ शिवसेना अत्यंत बेकायदेशीरपणे सोपवली आहे. कोणताही नियम, कायदा, कलमानुसार काम झालं नाही हे कपिल सिब्बल यांनी मांडल आहे''.

आंबोलीच्या महादेवगड पॉईंटवरून दरीत कोसळलेल्या डॉक्टरचा मृतदेह बाहेर काढण्यात यश

सिंधुदुर्ग । प्रतिनिधी : पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या आंबोली येथील महादेवगड पॉईंटवरून सुमारे ४०० फूट दरीत कोसळून पर्यटकाचा मृत्यू झाल्याची भीषण घटना मंगळवारी (दि.४) सायंकाळी घडली. डॉ. आयुब सय्यद (वय ४५, रा. जत्राट, निपाणी, जि. बेळगाव) असं दरीत कोसळून मृत झालेल्या पर्यटकाचं नाव आहे. बुधवारी (दि.५) दुपारी सह्याद्री ॲडव्हेंचर रेस्क्यू ग्रुपनं अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अथक प्रयत्न करून त्यांचा मृतदेह दरीतून बाहेर काढला.

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात भारतीय ज्ञान परंपरेवरील तीन दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

नागपूर । प्रतिनिधी : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीची सहा वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित 'अखिल भारतीय शिक्षा समागम २०२६' चा एक भाग म्हणून, वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात भारतीय ज्ञान परंपरेवर आधारित तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ४ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यापीठ परिसरातील अटलबिहारी वाजपेयी भवनातील 'स्वामी सहजानंद सरस्वती संग्रहालयात' कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. हे प्रदर्शन ६ ऑगस्ट २०२६ पर्यंत अभ्यागतांसाठी खुले राहणार आहे.

या उद्घाटन समारंभाला कुलसचिव कादर नवाझ खान, परीक्षा नियंत्रक डॉ. सुरेंद्र गाडेवार, वित्त अधिकारी पी. सरदार सिंग, प्रॉक्टर डॉ. राकेश मिश्रा, जनसंवाद विभागाचे प्रा. कृपाशंकर चौबे, विधी विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. जनार्दन कुमार तिवारी यांच्यासह मोठ्या संख्येने प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

'एसआयआर'ला पुन्हा मुदतवाढ

१७ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार मतदार पडताळणीची मोहीम

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : सध्या महाराष्ट्रात सुरु असलेल्या मतदारयादी विशेष सखोल पडताळणी म्हणेजच एसआयआर कार्यक्रमाच्या केंद्रीय निवडणूक आयोगाने त्यांच्या वेळापत्रकात मोठा आणि महत्वाचा बदल केला आहे. यापूर्वी मतदार पडताळणीची मोहीमेसाठी ८ ऑगस्टची मुदत देण्यात आलेली होती, मात्र आता ही मुदत वाढवण्यात आली असून मतदार पडताळणीची मोहीम १७ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहे. २४ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध होणार असून नागरिकांना दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आलेली आहे. त्यानंतर अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबरला प्रकाशित केली जाणार आहे.

मंगळवारी राज्याच्या निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक अधिकारी यांना याबाबत पत्र पाठवून सुधारित कार्यक्रम जाहीर केला. केंद्रीय निवडणूक आयोगाचे अवर सचिव संदीप कुमार यांनी जारी केलेल्या या पत्रानुसार, आयोगाच्या यापूर्वीच्या आदेशांमध्ये सुधारणा करून महाराष्ट्रासाठी नवीन वेळापत्रक निश्चित केले आहे. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या विनंतीनंतर हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेले सुधारित वेळापत्रक

- घरोघरी मतदार पडताळणी (बीएलओ भेटी) : ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६
- मतदान केंद्रांचे पुनर्रचना/तर्कसंगतीकरण : १७ऑगस्ट २०२६
- प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध : २४ ऑगस्ट २०२६
- दावे व हरकती दाखल करण्याची मुदत : २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६
- दावे-हरकतींची सुनावणी व निकाली काढणे : २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६
- अंतिम मतदारयादी प्रसिद्ध : २७ ऑक्टोबर २०२६

रुपाली चाकणकर यांच्या जागी वैशाली नागवडे

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी वैशाली नागवडे यांची, तर युवक प्रदेशाध्यक्षपदी निखिल ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते बुधवारी या दोन्ही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीचे पत्र देऊन जबाबदारी सोपवण्यात आली. भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणानंतर रुपाली चाकणकर यांना महिला प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. तेव्हापासून रिक्त असलेल्या या जागेवर अखेर वैशाली नागवडे यांच्या रूपाने नवा चेहरा देण्यात आला आहे.

पक्षसंघटन अधिक मजबूत करणे आणि आगामी राजकीय आव्हानांचा सामना करण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरण्याचा निर्णय पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उच्चस्तरीय बैठकीत घेण्यात आला होता. गेल्या आठवड्यात 'देवगिरी' निवासस्थानी पार पडलेल्या या बैठकीस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, खासदार पार्थ पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित होत्या. या बैठकीत महिला व युवक आघाडीला नवे आणि आक्रमक नेतृत्व देण्यावर एकमत झाले होते. त्यानुसार नागवडे व ठाकरे यांच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

महिला प्रदेशाध्यक्षपदासाठी पुण्यातूनच पक्षाच्या आक्रमक नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यादेखील शर्यतीत होत्या. मात्र पक्षाने ठोंबरे यांना डावलत नागवडे यांच्याकडेच ही धुरा सोपवणे पसंत केले. रुपाली चाकणकर यांच्यानंतर हे महत्त्वाचे पद पुन्हा एकदा पुणे जिल्ह्याकडेच गेले आहे. वैशाली नागवडे या सध्या पक्षाच्या प्रदेश प्रवक्त्या म्हणून काम पाहत असून त्यांनी यापूर्वी पुणे जिल्हाध्यक्षपद आणि प्रदेश सरचिटणीसपद सांभाळले आहे. दौंड तालुक्यातील सक्रिय व आक्रमक नेत्या म्हणून त्यांची ओळख असून २०१७ आणि २०२० च्या जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. दरम्यान, रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाबाबत मात्र अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. राष्ट्रवादीच्या कोट्यातील या महत्त्वाच्या संवैधानिक पदासाठी सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा शिंदे, डॉ. ज्योती मेटे आणि सुनेत्रा पवार यांच्या निकटवर्तीय वैशाली मोठे यांची नावे शर्यतीत असून, या नियुक्तीचा निर्णय पक्षाच्या पुढील बैठकीत होण्याची शक्यता आहे.

राज्यात एक हजार रोजगार मेळाव्यांचे आयोजन – मंत्री मंगलप्रभात लोढा

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : राज्यात युवक-युवतींना रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान एक हजार रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले जाणार आहे. या रोजगार मेळाव्यांची व्यापक माहिती गरजू तरुणांपर्यंत पोहोचण्यासाठी समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करणे गरजेचे असल्याचे मत कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात राज्यस्तरीय रोजगार मेळावा समितीची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यस्तरीय रोजगार मेळाव्याचे अध्यक्ष डॉ. रणजीत पाटील, सदस्य डॉ. सरोजिनी राऊत, रविंद्र देशपांडे, विशाल टिब्रेवाल, जयेश ढाके, राहुल खोले, सदस्य सचिव तथा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे आयुक्त डॉ.अमित सैनींसह शासकीय सदस्य उपस्थित होते. मंत्री लोढा म्हणाले की, आयटीआय व्यतिरिक्त इतर कॉलेजमधील विद्यार्थी, अपस्किलिंगची गरज असणारे तरुण आणि सामाजिक संस्थांशी संपर्क साधून रोजगार मेळाव्याच्या संपूर्ण कार्यक्रमाची व्यापक प्रसिद्धी करावी. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्हयात व तालुक्यात याची माहिती दिली जाईल. तरुणांना रोजगाराचे महत्व आणि स्वरोजगाराचे फायदे पटवून देण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती व एनजीओंच्या माध्यमातून समुपदेशन केले जाईल. पहिल्या आठवड्यात पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, एटीकेट (शिष्टाचार), बायोडाटा तयार करणे आणि संभाषण कौशल्यांवर भर दिला जाईल. दुसऱ्या आठवड्यामध्ये विद्यार्थ्यांच्या ॲप्टिट्यूड टेस्टनुसार इलेक्ट्रिसिटी, प्लंबिंग, रिसेप्शनिस्ट आणि मार्केटिंग यांसारख्या क्षेत्रांत थेट प्रात्यक्षिक दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.

मंत्री लोढा म्हणाले की, केवळ रोजगार मेळावे आयोजित न करता उमेदवारांना पूर्व-प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. रोजगार मेळाव्यापूर्वी उमेदवारांना दोन आठवड्यांचे कौशल्य व पूर्व-रोजगार प्रशिक्षण दिले जावे. उमेदवारांना योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळाल्यास मेळाव्यांमधील निवडीचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढेल. या उपक्रमाच्या नियोजनासाठी आणि अंमलबजावणीसाठी संबंधित विभागाचे अधिकारी व प्रदेश समन्वय समिती यांनी एकत्रितपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

समन्वय समिती व विभागीय अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन मेळावे यशस्वी करूया. समाजातील सर्व घटकांचा सहभाग वाढवून रोजगार निर्मितीची प्रक्रिया अधिक व्यापक आणि परिणामकारक बनवण्यावर भर देण्यात यावा. समितीतील सर्व सदस्यांनी या मोहिमेत सक्रीय सहभागी होऊन युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊया.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे आयुक्त डॉ. अमित सैनी यांनी रोजगार मेळाव्यांच्या केलेल्या नियोजनसंदर्भात बैठकीत माहिती दिली. समितीच्या सदस्यांनी रोजगार मेळाव्यासंदर्भात सूचना केल्या.

पंजाब निवडणूक अन् केजरीवालांची खेळी

'ई-२०' इंधनाच्या मुद्द्यावरून केजरीवालांनी काल दिल्लीत पुन्हा आंदोलनाच्या नव्या नाट्याचा प्रयोग करुन पाहिला. केंद्र सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली 'ई-२०'चा निर्णय घेतल्याचा खोटा दावा करत, थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानावर मोर्चा नेण्याचा फुटकळ प्रयत्न त्यांनी केला. मात्र, भारताच्या 'इथेनॉल मिश्रण' कार्यक्रमाचा दोन दशकांहून अधिक काळाचा इतिहास पाहता, हा आरोप तथ्यांच्या कसोटीवर टिकत नाही. दिल्लीतील सत्ता हातातून गेल्यानंतर आणि पंजाबची आगामी निवडणूक डोळ्यांसमोर असताना, केजरीवालांची या आंदोलनामागील राजकीय गणितेही लपून राहत नाही. आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल आणि आंदोलनाचे राजकारण यांचे नाते तसे जुनेच. एखाद्या धोरणातील त्रुटींवर तथ्याधारित चर्चा करण्याऐवजी त्याला राजकीय संघर्षाचे स्वरूप देऊन स्वतःची पोळी भाजून घेण्यात केजरीवालांचा हातखंडाच. आताही 'ई-२०' म्हणजे २० टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलच्या मुद्द्यावरून त्यांनी दिल्लीत नवा राजकीय आखाडा उभा केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'ई-२०'चा निर्णय घेतला आणि अमेरिकेतील टाकाऊ इथेनॉल भारतात आणले जात आहे, असा आरोप त्यांनी केला. याच आरोपाच्या आधारे कार्यकर्त्यांसह पंतप्रधानांच्या निवासस्थानाकडे मोर्चा नेण्याचा प्रयत्न झाला. धोरणावर प्रश्न विचारणे, हा लोकशाहीत अधिकार आहेच. मात्र, तथ्यांऐवजी संशय आणि भीतीच्या आधारे वातावरण तापवणे, ही जबाबदार विरोधी राजकारणाची पद्धत ठरू शकत नाही. 'ई-२०' बाबत केजरीवाल आणि त्यांचा पक्ष जे चित्र उभे करत आहेत, त्याची तथ्यांच्या आधारे चिकित्सा होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने इथेनॉल मिश्रणाचे धोरण देशाची ऊर्जासुरक्षा मजबूत करण्यासाठी, कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि देशांतर्गत इथेनॉल उत्पादनाला चालना देण्यासाठी राबविले आहे. ऊस, मका आणि अन्य कृषी उत्पादनांपासून देशात इथेनॉलची निर्मिती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे आयातीत खनिज इंधनावर खर्च होणाऱ्या परकीय चलनात बचत होण्याबरोबरच देशांतर्गत कृषी अर्थव्यवस्थेलाही नवी बाजारपेठ उपलब्ध झाली. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, भारतातील इथेनॉलमिश्रित पेट्रोल कार्यक्रम हा आज किंवा काल सुरू झालेला नाही. त्याची सुरुवात २००१ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर झाली. २००६ मध्ये 'ई-५' म्हणजे पाच टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलचा वापर सुरू झाला. त्यानंतर मिश्रणाचे प्रमाण टप्प्याटप्प्याने वाढवण्यात आले. म्हणजेच, भारताचा 'ई-२०'कडे जाणारा प्रवास सध्याच्या अमेरिकी व्यापार धोरणापेक्षा कितीतरी जुना आहे. मग दोन दशकांपासून विकसित होत आलेल्या भारतीय जैव-इंधन धोरणाचा संबंध अचानक ट्रम्प यांच्या दबावाशी कसा जोडता येईल, याचे उत्तर केजरीवालांनी द्यायला हवे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत एकदा 'आंदोलनजीवी' असा मार्मिक शब्दप्रयोग केला होता. कोणताही प्रश्न असो, त्यावर विधायक पर्याय देण्यापेक्षा आंदोलनाच्या माध्यमातून राजकीय वातावरण तापवणे ज्यांच्या राजकारणाचा स्थायीभाव बनतो, त्यांच्यासाठी हा शब्द अगदी चपखल ठरतो. केजरीवालांच्या राजकीय प्रवासातही आंदोलनाला कायमच मध्यवर्ती स्थान राहिले आहे. मग अगदी ते सत्तेत असले तरी! अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून त्यांचा राजकीय उदय झाला. पुढे मुख्यमंत्री झाल्यानंतरही धरणे, मोर्चे आणि केंद्राशी संघर्ष याच शैलीचा त्यांनी वारंवार आधार घेतला. दिल्लीतील सत्ता गेल्यानंतर पुन्हा त्याच परिचित मार्गाने राजकीय प्रासंगिकता निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू झाल्याचे 'ई-२०'च्या आंदोलनातून दिसते. अलीकडच्या काळातील विरोधी राजकारणातही अशीच एक पद्धत सातत्याने समोर येत आहे. एखाद्या वर्गात असंतोष निर्माण झाला की, त्याच्या रास्त प्रश्नांची संस्थात्मक सोडवणूक करण्याऐवजी त्या असंतोषाला व्यापक सरकारविरोधी संघर्षाचे स्वरूप दिले जाते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून राहुल गांधी आणि अन्य विरोधी नेत्यांनी केलेले आरोप असोत किंवा आता 'ई-२०'वरून केजरीवालांनी उभा केलेला संघर्ष असो, प्रत्येक मुद्द्याला मोदीविरोधी राजकीय कथानकात बसवण्याचा प्रयत्न दिसतो. आंदोलनातून राजकीय वातावरण तापवण्याच्या पद्धतीतील साम्य दुर्लक्षित करता येत नाही. केजरीवालांच्या या आक्रमकतेचा पंजाबमधील आगामी राजकीय लढाईशी असलेला संबंधही विचारात घ्यावा लागेल. पंजाबमध्ये भगवंत मान या नामधारी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात सध्या आम आदमी पार्टीची सत्ता आहे आणि पुढील विधानसभा निवडणूक पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. कायदा-सुव्यवस्था, अमली पदार्थांची समस्या आणि खलिस्तानी कारवायांबाबत विरोधकांकडून पंजाब सरकारला सातत्याने लक्ष्य केले जात आहे. अशा स्थितीत केंद्र सरकारविरोधात संघर्षाचे नवे कारण निर्माण करणे आम आदमी पार्टीसाठी राजकीयदृष्ट्या सोयीचे ठरू शकते. 'ई-२०'सारखा थेट वाहनधारक, शेतकरी आणि मध्यमवर्गाशी संबंधित विषय त्यासाठी अधिक उपयुक्त ठरतो. त्यामुळे या आंदोलनाची वेळ आणि त्याला देण्यात आलेले नाट्यमय स्वरूप पंजाबमधील आगामी राजकीय गणितापासून पूर्णपणे वेगळे करून पाहता येणार नाही. मात्र, 'ई-२०'ला विरोध करताना केजरीवालांनी देशासमोर व्यवहार्य पर्यायही ठेवायला हवा. भारताचे कच्च्या तेलावरील आयात अवलंबित्व कमी करण्याचा त्यांचा मार्ग कोणता? देशांतर्गत इथेनॉल उत्पादनामुळे शेतकऱ्यांसाठी निर्माण झालेल्या बाजाराचे काय करायचे? जैव-इंधन धोरणाला त्यांच्याकडे कोणता पर्याय आहे? त्यामुळे विरोधी पक्षाने सरकारला प्रश्न विचारतानाच, स्वतःची उत्तरेही देशासमोर ठेवली पाहिजेत. विरोध म्हणजे प्रत्येक गोष्टीला नकार नव्हे; व्यवहार्य पर्याय मांडणे हीदेखील विरोधी पक्षाची जबाबदारी आहे. भारताला सक्षम आणि अभ्यासू विरोधी पक्षांची आवश्यकता आहेच. सरकारच्या प्रत्येक निर्णयाला होकार देणारा विरोधी पक्ष लोकशाहीसाठी उपयोगाचा नाही; परंतु प्रत्येक निर्णयावर रस्त्यावर उतरणे, हाच विरोध समजणारा पक्षही लोकशाहीला बळ देत नाही. आंदोलन हे राजकारणाचे एक साधन असू शकते; राजकारणाचा कायमस्वरूपी पर्याय नाही. केजरीवालांची राजकीय ओळख आंदोलनातून निर्माण झाली. मात्र, आंदोलनातून जन्माला आलेल्या पक्षाने सत्तेचा दीर्घ अनुभव घेतल्यानंतर तरी आंदोलन आणि प्रशासन यांतील फरक समजून घेणे अपेक्षित आहे. दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. त्यात आता केजरीवालांनी 'ई-२०'चा मुद्दा पेटवल्यानंतर लगोलग त्यांचा चेला असलेल्या अभिजित दीपकेनेही या आंदोलनात उडी घेण्याचा इशारा दिला. त्यामुळे 'सीजेपी'च्या आंदोलनावेळी 'आधी तू आंदोलन कर, मी समर्थन देतो' अशी केजरीवालांनी भूमिका घेतली आणि आता केजरीवालांच्या समर्थनार्थ दीपकेनेही आंदोलनात उडी घेण्याबाबत तत्परता दाखविली. त्यामुळे एक आंदोलन यशस्वी झाल्यानंतर लगोलग दुसरे आंदोलन पेटवायचे आणि त्यातून पुन्हा अराजकाची परिस्थिती देशात निर्माण करायची, हीच या आंदोलनजीवींची रणनीती!

महाराष्ट्रात 'ॲनालॉग पनीर'वर वर्षभराची बंदी

तुकाराम मुंढेंचा आणखी एक तडाखा; हॉटेल, रेस्टॉरंट आणि केटरर्सनाही वापरास मनाई

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : महाराष्ट्रातील जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाने कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी बनावट पनीरच्या विक्रीवर धडक कारवाई करत राज्यात 'ॲनालॉग पनीर'वर (नॉन-डेअरी पनीर) वर्षभरासाठी बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील आदेश अधिकृत राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियमानुसार कठोर कारवाई

हा बंदीचा आदेश अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मधील कलम ३०(२)(अ) अन्वये लागू करण्यात आला आहे. एफडीएच्या नियमांनुसार 'पनीर' हा एक प्रमाणित अन्नपदार्थ असून त्यात दुधातील स्निग्धांश असणे अत्यंत आवश्यक आहे. दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पती तेल, वनस्पती स्निग्धांश किंवा अन्य दुग्धेतर घटकांचा वापर करून तयार केलेले उत्पादन हे कायद्यानुसार 'दुग्ध संदर्भातील ॲनालॉग' ठरते. त्यामुळे अशा उत्पादनाला 'पनीर' नाव देऊन विकणे किंवा ग्राहकांना पुरवणे हा कायद्याने गंभीर गुन्हा मानला जाईल.

हॉटेल, रेस्टॉरंट आणि केटरर्सवरही निर्बंध

या निर्णयाचा थेट परिणाम राज्यातील हॉटेल, रेस्टॉरंट, भोजनालये, क्लाऊड किचन आणि केटरर्सवर होणार आहे.

वापरावर मनाई: कोणत्याही अन्नपदार्थात ॲनालॉग किंवा नॉन-डेअरी पनीरचा वापर करणे, त्याची साठवणूक करणे, विक्री करणे किंवा ग्राहकांना ते सर्व्ह करण्यास पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. दिशाभूल थांबवण्याचा प्रयत्न: ग्राहकांना अस्सल पनीर असल्याचा भास निर्माण करून असे उत्पादन वापरणे ही शुद्ध दिशाभूल आहे.

दंडात्मक कारवाई: नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित उत्पादन 'मिथ्याछापित' मानले जाईल. अशा व्यावसायिकांवर कायद्यातील दंडात्मक तरतुदींनुसार कारवाई केली जाईल, तसेच साठा जप्त करून तो नष्ट केला जाईल.

नियमित शुद्ध पनीरवर कोणतीही बंदी नाही

या आदेशामुळे बाजारातील सर्व प्रकारच्या पनीरवर बंदी आलेली नाही. नियमानुसार ठरवून दिलेल्या मानकांचे पालन करणारे पनीर बाजारात उपलब्ध राहील.

फुल-फॅट पनीर: निर्धारित निकष पूर्ण करणारे नियमित फुल-फॅट पनीर सैल किंवा पॅकबंद स्वरूपात विकता येईल.

मीडियम व लो-फॅट पनीर: या श्रेणीतील पनीरची विक्री सीलबंद पॅकेजमध्ये आणि अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग व प्रदर्शन) विनियम, २०२० नुसार सर्व आवश्यक घोषणांसह करणे बंधनकारक आहे.

ॲनालॉग पनीर म्हणजे काय आणि ते कसे ओळखायचे?

ॲनालॉग किंवा नॉन-डेअरी पनीर म्हणजे हुबेहूब अस्सल पनीरसारखे दिसणारे बनावट उत्पादन. यात दुधाऐवजी संपूर्णतः किंवा अंशतः वनस्पती तेल (Vegetable Oil), वनस्पती स्निग्धांश आणि इतर दुग्धेतर घटकांचे मिश्रण करून ते तयार केले जाते.

ॲनालॉग पनीर कसे ओळखायचे?

लेबलची पाहणी: पॅकेटवर 'Analog Cheese/Paneer' किंवा 'Non-Dairy Product' असे नमूद केलेले असते.

घटक (Ingredients): घटकांच्या यादीत दुधाऐवजी 'Vegetable Fat' किंवा 'Hydrogenated Oil' लिहिलेले आढळल्यास ते ॲनालॉग पनीर असते.

पोत आणि चव: अस्सल पनीरच्या तुलनेत हे पनीर अधिक रबरासारखे ताणले जाणारे किंवा वेगळ्याच तेलकट पोताचे लागते.

आता रांचीमध्ये जंतर मंतरसारखे आंदोलन, २ विद्यार्थ्यांचे धो धो पावसात उपोषण

सोनम वांगचुक यांच्या सांगण्यावरून पाणी घेतलं, अन्नत्याग कायम; ७ ऑगस्टला विधानसभेला घेराव घालणार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था : परीक्षेतील अनियमिततेविरोधात रांचीच्या जयपाल सिंह मुंडा स्टेडियमम धील विद्यार्थ्यांचे आंदोलन बुधवारी बाराव्या दिवशीही सुरू होते. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी उपोषणावर बसलेल्या विद्यार्थी नेते देवेंद्र नाथ महातो आणि ब्रह्मानंद यांना व्हिडिओ कॉल करून पाणी दिले. या दोघांनी २ ऑगस्टपासून अन्न आणि पाणी सेवन बंद केले होते. यानंतर, त्या दोन विद्यार्थ्यांनी ''आमचे उपोषण सुरूच राहील,'' अशी घोषणा केली. दरम्यान, ब्रह्मानंदने मंगळवारी उघड्यावर उपोषण केले. पावसात केलेल्या त्याच्या उपोषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.

जेपीएससी, जेएसएससी-सीजीएल आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील अनियमिततेविरोधात निष्पक्ष चौकशी आणि कारवाईची मागणी विद्यार्थी करत आहेत. आंदोलकांनी सांगितले की, त्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास ते ७ ऑगस्ट रोजी विधानसभेला घेराव घालतील.

विद्यार्थी आंदोलन का करत आहेत?

२ जुलै रोजी, झारखंड लोकसेवा आयोगाने (जेपीएससी) १४ व्या संयुक्त नागरी सेवा पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर केला. मुख्य परीक्षेसाठी २,२०४ उमेदवारांची निवड झाली. मुख्य परीक्षा १८ ते २० जुलै दरम्यान होणार होती. निकाल जाहीर झाल्यानंतर, अनेक उमेदवारांनी अनियमिततेचे आरोप केले. कट-ऑफ जाहीर झाला नसल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, एका उमेदवाराची कथित ओएमआर शीट सोशल मीडियावर व्हायरल झाली. त्याने केवळ ४८ प्रश्न सोडवले असूनही त्याची मुख्य परीक्षेसाठी निवड झाल्याचा दावा करण्यात आला. निकालावर आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या सह्या नसल्याबद्दलही प्रश्न उपस्थित करण्यात आले. वाढत्या वादामुळे, जेपीएससीने मुख्य परीक्षा रद्द केली.

विद्यार्थ्यांच्या मागण्या काय आहेत?

विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, जेपीएससीच्या अनेक भरती परीक्षा वादात सापडल्या आहेत. त्यामुळे, त्यांना केवळ १४ व्या जेपीएससी परीक्षेतच नव्हे, तर संपूर्ण भरती प्रक्रियेत बदल हवा आहे. त्यांच्या मुख्य मागण्या खालीलप्रमाणे आहेत:

१४ व्या जेपीएससी परीक्षेची चौकशी सीबीआय आणि अंमलबारी संचालनालयामार्फत (ईडी) केली जावी. केवळ सीआयडीच्या तपासावर विश्वास नाही, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

प्रकरणाची सुनावणी जलदगतीने करून विहित वेळेत निर्णय देण्यासाठी जलदगती न्यायालयाची स्थापना करावी. टीडीपीएल (टीएसआर डेटा प्रोसेसिंग प्रायव्हेट लिमिटेड) द्वारे आयोजित सर्व परीक्षा रद्द कराव्यात. विद्यार्थ्यांचा आरोप आहे की, कंपनीशी संबंधित एका अधिकाऱ्यावर भरतीमधील अनियमिततेचा आरोप आहे. टीडीपीएलला काळ्या यादीत टाकावे आणि भविष्यातील परीक्षा टीसीएससारख्या विश्वासार्ह कंपनीमार्फत घ्याव्यात.

झारखंडमध्ये पेपरफुटीविरोधातील आंदोलनात उतरणार का? अभिजीत दिपकेंनी एका वाक्यात विषय संपवला...

दैनिक आपला विदर्भ

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी : नीट पेपरफुटीवर दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलन उभारुन शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टी चर्चेत आली आहे. नीटनंतर झारखंडम धील पेपरफुटी आंदोलनावर कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्यावर प्रश्नांचा भडिमार केला जात होता. अखेर या आंदोलनावरून दिपके यांनी मौन सोडलं आहे.

झारखंडमधील पेपरफुटी प्रकरणावरून तापलेल्या वातावरणात आता 'कॉक्रोच जनता पार्टी'ने थेट आंदोलनात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. अभिजीत दिपके यांनी संघटनेच्या बैठकीनंतर छत्रपती संभाजीनगरम ध्ये माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना दिपके यांनी सांगितले की, ''आम्ही झारखंडच्या विद्यार्थ्यांना पूर्ण पाठिंबा दिला असून त्यांच्या आंदोलनाला ताकद देण्यासाठी स्वत: झारखंडला जाणार असल्याची घोषणा अभिजीत दिपके यांनी केली. झारखंडम धील आंदोलनात उतरणार का, या प्रश्नावर दिपकेंनी अवघ्या एका वाक्यात उत्तर देत सर्व चर्चांना पूर्णविराम दिला.

राजकारणात उतरणार का?

ण्ड्झब प्रत्यक्ष राजकारणात प्रवेश करणार का, या प्रश्नावर बोलताना दिपके यांनी आमची राजकारणात जाण्याची कोणतीही इच्छा नसल्याचे स्पष्ट केले. देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर चिंता व्यक्त करत ते म्हणाले, ''आज देशात राजकीय पक्षांची स्थिती अतिशय बिकट झाली आहे. सकाळी एका पक्षात असलेला आमदार किंवा खासदार संध्याकाळी दुसऱ्या पक्षात दिसतो. ईडी आणि सीबीआयचा वापर करून राजकीय पक्ष फोडले जात आहेत. देशातील सध्याच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी राजकीय पक्षांना बाजूला ठेवून सर्व सामान्य नागरिकांनी एकत्र येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ''लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे,'' असेही ते म्हणाले.

या महत्त्वाच्या बैठकीला सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ सोनम वांगचुक गैरहजर राहिल्याने तर्क-वितर्क लढवले जात होते. यावर स्पष्टीकरण देताना अभिजीत दिपके यांनी सांगितले की, सोनम वांगचुक यांची तब्येत ठीक नसल्यामुळे ते या बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत. उद्या दुपारी दोन वाजता संघटनेच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन पुढील भूमिका अधिक सविस्तरपणे मांडली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आदिवासी गावाची जागतिक ओळख: उधमाळ ठरणार भारतातलं पहिलं 'डार्क स्काय कम्युनिटी' गाव, ४२.१४ लाखांचा निधी मंजूर

दैनिक आपला विदर्भ

नाशिक । प्रतिनिधी : जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील उधमळ गाव आता आकाशातील तारे पाहण्यासाठी जगभर ओळखलं जाणार आहे. डार्कस्काय इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून प्रमाणित होणारं भारतातील पहिलं 'डार्क स्काय कम्युनिटी' गाव म्हणून उधमळ गावाचा नावलौकिक होणार आहे.

खगोलशास्त्र शिक्षणासाठी ऐतिहासिक उपक्रम : नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील उधमळ गाव भारताच्या खगोलशास्त्र आणि आकाश संवर्धनाच्या इतिहासात नवे पर्व निर्माण करणार आहे. 'डार्कस्काय इंटरनॅशनल' या जागतिक संस्थेकडून 'डार्क स्काय कम्युनिटी' म्हणून प्रमाणित होणारे देशातील पहिले गाव म्हणून 'उधमल'ची निवड करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव आयुष प्रसाद यांनी या उपक्रमासाठी आवश्यक निधीस प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

अंतराळ संशोधनाबद्दल रुची : या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट नाशिक जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्र आणि अंतराळ संशोधनाबद्दल रुची निर्माण करणे तसंच वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आहे. भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्यानुसार तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि संशोधनाची भावना रुजविण्याच्या उद्देशानं हा प्रकल्प राबवला जातोय. उधमळ गावातील नैसर्गिकरित्या स्वच्छ आणि अंधारमय आकाश विद्यार्थ्यांना अवकाशाचं निरीक्षण करण्यासाठी आदर्श ठरणार आहे.

पर्यावरणपूरक प्रकाश व्यवस्था : पेसा (अनुसूचित क्षेत्रांमध्ये पंचायतींचा विस्तार) कायद्या अंतर्गत उधमळ ग्रामसभेनं रात्रीच्या आकाशाचं संवर्धन करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. गावातील नागरिकांनी बाह्य प्रकाश व्यवस्था अवलंबण्यासाठी ठराव पारित केलाय. प्रकाश प्रदूषण कमी करण्यासाठी सुरक्षित, कार्यक्षम ऊर्जा आणि पर्यावरणपूरक प्रकाश व्यवस्था अवलंबण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

४२.१४ लाखांचा निधी मंजुर: जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना (२०२६-२७) च्या 'इनोव्हेटिव्ह स्कीम' अंतर्गत या उपक्रमासाठी ४२.१४ लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. या निधीतून रात्रीच्या आकाशाच्या गुणवत्तेचं मूल्यांकन, जबाबदार प्रकाश व्यवस्था अंमलबजावणी, जनजागृती कार्यक्रम आणि स्थानिक तरुणांचे प्रशिक्षण यासारखे उपक्रम राबवले जाणार आहेत.

नवीन रोजगाराच्या शाश्वत संधी : 'ॲस्ट्रो-टुरिझम' अर्थात खगोल पर्यटनाची संकल्पना जिल्हा नियोजन समितीच्या पर्यटन विकासाच्या प्रयत्नांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या उपक्रमामुळं उधमळ आणि आसपासच्या भागातील रहिवाशांसाठी नवीन रोजगाराच्या शाश्वत संधी निर्माण होतील. या संकल्पनेमुळं नैसर्गिक वारसा देखील जपला जाईल. प्रकाश प्रदूषण कमी झाल्यानं जैवविविधताही वाढेल आणि गावातील जीवनमान सुधारेल, असा गावकऱ्यांना विश्वास आहे.

खगोलीय घटनांचे करता येणार निरीक्षण : या उपक्रमामुळं विद्यार्थी दुर्बिणीद्वारे ग्रह, तारे, आकाशगंगा आणि इतर खगोलीय घटनांचे निरीक्षण करू शकतील. शाळांमध्ये खगोलशास्त्र क्लब स्थापन करणे, कार्यशाळा आयोजित करणे आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे यासारख्या उपक्रमांना चालना मिळेल. स्थानिक युवकांना मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षण देऊन पर्यटकांना आकर्षित केले जाईल.

पर्यावरण संवर्धनाला नवी दिशा : उधमळचे अंधारमय आकाश हे केवळ वैज्ञानिक संशोधनासाठीच नव्हे, तर सांस्कृतिक आणि आध्यात्मिकदृष्ट्याही महत्त्वाचं आहे. पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञानाचा संगम येथे अनुभवता येईल. यामुळं आदिवासी भागाचा सर्वांगीण विकास होईल आणि पर्यावरण संतुलन राखलं जाईल. नाशिक जिल्हा आता केवळ ऐतिहासिक आणि धार्मिक पर्यटनासाठीच नव्हे तर खगोल पर्यटनासाठीही ओळखला जाईल. उधमळचं हे पाऊल भारताच्या वैज्ञानिक प्रगतीला आणि पर्यावरण संवर्धनाला नवी दिशा देणारे ठरेल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

महत्त्वाचे...

भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री. रविंद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. देवराम होळी व प्रभारी आणि प्रदेश महामंत्री आ. योगेश सागर यांनी अनुसूचित जमाती मोर्चाची प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली आहे. उपाध्यक्षपदी नागपूर जिल्ह्यातील विरेंद्रशहा उइके, सुदर्शन शिंदे (हिंगोली), अशोक इरनाक (ठाणे), डॉ. सुप्रिया गावित (नंदुरबार) आदींची नियुक्ती करण्यात आली आहे. तर सरचिटणीसपदी नाशिकचे एन.डी. गावित, गणेश इंगळे (जालना), आकाश मडावी (नागपूर) आदींची तर प्रदेश कार्यकारिणी सदस्य म्हणून ज्ञानेश्वर भोसले (सोलापूर), केवल झामरकर (अमरावती), गिरीष चव्हाण (अहिल्यानगर) आदींचा समावेश आहे. कोषाध्यक्षपदी विवेक नागभिरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांवरील अमानुष अत्याचार विरोधात युवक काँग्रेसचे वांद्रे आणि बोरीवलीत बॅनर फडकावून आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : नीट पेपरफुटीविरोधात शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर मोदी-शाहच्या सरकारने लाठीचार्ज केला तसेच पेलेट गनच्या वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले, मुलींनाही अत्यंत वाईट वागणूक देण्यात आली. विद्यार्थ्यांवरील कारवाईच्या निषेधार्थ मुंबई युवक काँग्रेसच्या वतीने वांद्रे आणि बोरीवली (पश्चिम) येथे बॅनर फडकावून निदर्शने करण्यात आली.

''पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाला असतानाही दोषींवर कठोर कारवाई करण्याऐवजी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरच पोलीस बळाचा वापर करण्यात आला. हा प्रकार अत्यंत निषेधार्ह असून लोकशाही व्यवस्थेला काळिमा फासणारा आहे. पेपरफुटी प्रकरणातील सर्व दोषींवर कठोर कारवाई करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा. विद्यार्थ्यांवरील अमानुष कारवाईची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तात्काळ राजीनामा द्यावा तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी'', अशी मागणी युवक काँग्रेसने केली.

मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मुंबई उत्तर मध्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष निखिल रुपारेल आणि उत्तर मुंबई युवक काँग्रेसचे अध्यक्ष अजयकुमार मिश्रा यांच्या पुढाकाराने केंद्र सरकारच्या निषेधार्थ मोठे बॅनर फडकावण्यात आले. यावेळी मुंबई युवक काँग्रेसचे संघटन सरचिटणीस तेजस चंदूरकर, राज्य सरचिटणीस अमनदीप सिंह व मितेश सोनकर, उत्तर मध्य जिल्हा सरचिटणीस मुस्तकीम शेख, कलिना तालुका अध्यक्ष विकास जैसवार, चारकोप विधानसभा अध्यक्ष आशीष सरोज, बोरिवली विधानसभा अध्यक्ष विजय नगराळे, दहिसर विधानसभा अध्यक्ष आरिफ सय्यद तसेच मागाठाणे विधानसभा उपाध्यक्ष दीपक विश्वकर्मा यांनी आंदोलनात सक्रिय सहभाग घेत केंद्र सरकारचा निषेध केला.

कॉक्रोच जनता पार्टी एक दबाव गट म्हणून काम करणार : अभिजीत दिपके

दैनिक आपला विदर्भ

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी : झारखंड येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी आम्ही जाणार असल्याची माहिती कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीनं पत्रकार परिषदेत देण्यात आली. देशातील जनतेचा राजकीय पक्ष, संघटना, न्याय व्यवस्था, पत्रकार यांच्यावरील विश्वास उडाला आहे, तो परत आणण्याची गरज निर्माण झाली आहे. आम्ही राजकीय पक्ष म्हणून पुढे येण्यापेक्षा जनतेच्या समस्यांवर आवाज उठवणारा दबाव गट म्हणून पुढे यायचा प्रयत्न करणार असल्याचं अभिजीत दिपके यांनी सांगितलं. दोन दिवसात होणाऱ्या बैठकीत बेरोजगारी, देशाची अर्थव्यवस्था, इथेनॉल मिश्रित पेट्रोल अशा मुद्द्यांवर पुढील रूपरेषा ठरवण्याचा प्रयत्न करणार असल्याचं देखील त्यांनी सांगितलं. संघटनेच्या बैठकीत देशभरातून जवळपास दहा ते अकरा सदस्य उपस्थित आहेत.

''पुढील दिशा ठरवणार...'' : अभिजीत दिपके यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितलं की, दोन दिवसीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं असून त्यामध्ये संघटनेची पुढील दिशा ठरवण्यात येणार आहे. जंतर मंतरवर झालेलं आंदोलन यशस्वी ठरलं, आम्हाला देशभरातून समर्थन मिळालंय. त्यामुळे आता इतर राज्यांमध्ये कशा पद्धतीनं संघटनेचा विस्तार करायचा याबाबत आम्ही चर्चा करणार आहोत. दिल्लीच्या आंदोलनानंतर आमची जबाबदारी वाढली आहे. सर्वत्र संघटन कसं वाढलं पाहिजे, यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. बैठकीबाबत उद्या गुरुवारी पत्रकारांशी संवाद साधून माहिती देण्यात येणार असल्याचेही अभिजीत दिपके यांनी स्पष्ट केले.

नितीन गडकरींना हायकोर्टाचा मोठा दिलासा, ई २० शी संबंधित सर्व डिपफेक मजकूर तत्काळ हटवण्याचे आदेश जारी

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : ई-२० पेट्रोलवरून प्रचंड ट्रोल होत असलेल्या केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मुंबई उच्च न्यायालयानं मोठा दिलासा दिला आहे. यासंदर्भात गडकरींची बदनामी करणारा सर्व मजकूर सोशल मीडिया आणि इटरनेटवरून तत्काळ हटवण्याचे आदेश हायकोर्टानं आज बुधवारी (५ ऑगस्ट) जारी केले आहेत. याप्रकरणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अब्रुनुकसानीची याचिका दाखल करत यात मेटा, एक्स, गुगल, यूट्यूब आणि आयटी मंत्रालयासह अनेकांविरुद्ध दावा ठोकत ११ कोटी रुपये नुकसान भरपाई मागितली आहे.

हायकोर्टाचे नेमके निर्देश काय? : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दाखल केलेल्या या याचिकेवर आज बुधवारी न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या एकलपीठापुढे सुनावणी झाली. सर्व बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर हायकोर्टानं निर्देश देताना स्पष्ट केलंय की, प्रथम दर्शनी नितीन गडकरी यांच्या दाव्यात तथ्य आढळत असून सबंधित मजकूर हा टिकात्मक आणि आक्षेपार्हच आहे. अश्या पद्धतीनं एखाद्या व्यक्तीविरोधात

जाहीरपणे सोशल मीडियावर टिका होणं गैर आहे. गुगल आणि मेटा यानी स्वत:हून हा संपूर्ण संबंधित आक्षेपार्ह मजकूर हटवण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे हा सर्व मजकूर तत्काळ सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉमवरून हटवण्याचे आदेश दिले जात आहेत. भविष्यात जर अश्या प्रकारचा नवा मजकूर पुन्हा प्रसारित झाल्यास याचिकाकर्ते थेट या कंपन्यांशी संपर्क साधून तो हवण्याची सूचना करू शकतात, ज्यावर कारवाई करणं संबंधितांना अनिवार्य राहील.

टिका ही मर्यादेत राहूनच केली जावी, जर कुणी मर्यादा ओलांडत असेल तर ते योग्य नाही, असंही यावेळी हाकोर्टानं नमूद केलं. जर सूचना करूनही अश्या पद्धतीनं एआयचा वापर करून तयार केलेला डीपफेक मजकूर हटवला गेला नाही, तर याचिकाकर्त्यांना पुन्हा कोर्टात येण्याची मुभा राहील. मुळात गुगल आणि मेटा सारख्या अग्रगण्य कंपन्यांनी स्वत:ची अशी एक कार्यप्रणाली विकसित करायला हवी, जी अश्या पद्धतीच्या तक्रारी हाताळून त्यांचं तातडीनं निवारण करू शकेल, जेणेकरून संबधित व्यक्तींना वारंवार कोर्टात यावं लागणार नाही. असं स्पष्ट करत हायकोर्टानं या प्रकरणाची सुनावणी चार आठवड्यांकरता तहकूब केली आहे.

काय आहे याचिका? : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या ८६ पानी याचिकेतून दावा केला की, केंद्र सरकारच्या ई-२० (पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण) योजनेशी आपला काहीही संबंध नाही. मात्र तरीही यामुळे गाड्या खराब होत असल्याला अपप्रचार करत आपल्यालाच यासाठी जबाबद ठरवलं जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यासाठी सोशल मीडियावर एक मोहीम राबवली जात असून याकरता ही सेवा पुरवणाऱ्या मेटा, एक्स, गूगल, यूट्यूब आणि काही अज्ञात सोशल मीडिया युजर्सविरुद्ध त्यांनी हायकोर्टात दावा केला आहे. सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेले एआय प्रणित डीपफेक व्हिडीओ आणि मॉर्फ केलेले फोटो आणि मीम्स तत्काळ काढण्याचे निर्देश देण्याची मागणी करत ११ कोटी रुपये नुकसान भरपाईचा दावाही केला आहे.

याचिकेतील दावा काय? : आपले वकील संदिप लड्डा यांच्यामार्फत दाखल केलेल्या या याचिकेत गडकरींनी दावा केला की, ई-२० योजनेशी आपला काहिही संबंध नाही. खरं तर ही योजना पेट्रोलियम मंत्रालयामार्फत चालवली जाते आहे. आपल्या अखत्यारित असलेल्या रस्ते परिवहन मंत्रालयाशी याचा कोणताही थेट संबंध नाही. मुळात इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाची सुरुवात साल २००३ मध्येच झाली होती. केंद्र सरकारनं तेव्हाच पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचं धोरण अंगिकारण्याचं ठरवलं होतं. पुढे कालांतरानं ही योजना अंमलात यायला साल २०२५ उजाडलं, आण पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळ्याचं प्रमाण ठरवून ई-२० उदयास आलं. युरोपात अनेक देशात ई-२० आणि काही देशांत तर ई-३० पेट्रोलही फार पूर्वीपासून उपलब्ध करण्यात आलं आहे. त्यामुळे हे धोरण लागू करणारा भारत हा काही पहिला देश नाही.

काय आहे प्रकरण? : गेल्या काही दिवसांपासून पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या मुद्दयावरुन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना सोशल मीडियावरुन प्रचंड ट्रोल केले जातं आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळलं जात असल्यानं सध्या वाहनांमध्ये बिघाड होत असल्याचा आरोप अनेकांकडून केला जातो आहे. गडकरींकडून फार पूर्वीपासून त्यांच्या मुलाच्या इथेनॉल निर्मितीच्या कारखासाठीच इंधनात इथेनॉल मिसळून ए२० पेट्रोल तयार करण्याच्या निर्णयाचं समर्थन केलं जात असल्याचा आरोपही यावेळी अनेकांनी सोशल मीडीयावर केला आहे. त्यातच आता सीजेपीच्या आंदोलनात धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता पुढचा नंबर नितीन गडकरींचा असल्याचा दावा अनेक सोशल मीडिया अकाऊंटवरुन केला जातो आहे. याविरोधात नितीन गडकरी हे मेटा, गुगल आणि एक्स यां सोशल मीडिया प्लॅटफफॉर्मच्याविरोधात दिवाणी खटला दाखल करु शकतात, असा निवार्ळा मुंबई उच्च न्यायालयानं सोमवारीच आपल्या निकालातून दिला, त्यानुसार ही याचिका दाखल करण्यात आली होती.

काँग्रेसने सुनेबद्दल इतकं घाणेरडं वक्तव्य केलंय, तरीही शरद पवार शांत का? काँग्रेसची साथ सोडून बाहेर पडा: संजय काकडे

मुंबई । प्रतिनिधी : काँग्रेसचे विचारधारा घाणेरडी झाली आहे. सुनेबद्दल इतकं घाणेरडं वक्तव्य करुनही शरद पवार शांत का बसले आहेत? शरद पवारांनी काँग्रेसची साथ सोडून महाविकास आघाडीमधून बाहेर पडावे, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय काकडे यांनी केले. ते बुधवारी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. आम्ही काँग्रेसच्या लोकांनी यांनी शेण खाल्लं आहे आणि घाण खाल्ली आहे. पृथ्वीराज चव्हाण यांना पक्षातून काढून टाका. आम्ही ४८ तास वाट पाहू आणि रस्त्यावर उतरुन आंदोलन करु, अशा इशाराही संजय काकडे यांनी दिला.

इंदिरा गांधी यांच्यावेळी त्यांना गुंगी गुडिया बोलल्यानंतर वादळ उठले होते. विरोधाकांनी राजकीय, वैचारिक बोलावे. सुनेत्रा पवारांबाबत केलेल्या या वक्तव्यावरुन महायुती रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहे. काँग्रेसच्या कुठल्याही नेत्याला रस्त्यावर फिरू देणार नाही. काँग्रेसने जशास तसे उत्तर द्यावं. आम्हाला तेच हवं आहे. आम्ही वाट पाहत आहोत, असे संजय काकडे यांनी म्हटले. यावर आता काँग्रेस आणि शरद पवार गटाचे नेते काय प्रतिक्रिया देणार, याकडे राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसकडून बुधवारी वैशाली नागवडे यांची पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. यानंतर वैशाली नागवडे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. राजकारणाची सुरुवात अजित पवारांमुळे घडलो आहे. आज ते हवे होते. आज सुनेत्रा पवार यांच्या हस्ते पत्र मिळाले आहे. आज जबाबदारी खूप वाढली आहे. दादांची कामाचा माणूस ही ओळख आम्हाला आणखी तळागाळात घेऊन जायची आहे, असे नागवडे यांनी सांगितले. पुणे शहरात आम्ही काल आंदोलन केलं आहे. शिव शाहू फुले आंबेडकर विचारधारा जपणारा महाराष्ट्र आहे. काँग्रेसला हे कळायला हवे. किती मोठ दु:ख पचवून त्या कशा प्रकारे पदावर आल्या हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. त्यामुळे त्यांच्याबाबत जबाबदारीने बोलणं गरजेचे होतं.

स्नॅक्सचं पाकिट फोडलं अनब ५ वर्षीय मुलाचा मृत्यू; प्रत्येक पालकाला हादरवणारा प्रकार

म्हैसूर । वृत्तसंस्था : कर्नाटकातील म्हैसूर जिल्ह्यात कोणत्याही पालकांची झोप उडवणारी एक अत्यंत भयंकर घटना घडली आहे. येथे एका प्रसिद्ध स्नॅक्स कंपनीच्या पाकिटात सापडलेला प्लास्टिकचा छोटा खेळण्यातील चेंडू गिळल्यामुळे पाच वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या बातमीला स्थानिक पोलिसांनी दुजोरा दिला आहे. मुकुंद मयूर पाच वर्षीय मयत मुलाचे नाव आहे. मुकुंद हा याच गावातील ग्रामपंचायतीच्या माजी उपाध्यक्षा गौराम्मा आणि शंकर नायक यांचा नातू, तसेच संतोष आणि ऐश्वर्या यांचा एकुलता एक मुलगा होता. या घटनेनं संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, मुकुंदला स्नॅक्सच्या पाकिटात प्लास्टिकचा एक छोटा खेळण्यातील चेंडू सापडला. त्याने खेळता खेळता तो छोटासा चेंडू चुकून गिळला. हा चेंडू त्याच्या घशात अडकल्यामुळे त्याला श्वास अडकल्याचा संशय आहे. मुलाला तातडीने वैद्यकीय उपचारांसाठी जवळच्या दवाखान्यात नेण्यात आले, परंतु त्याला वाचवण्यात अपयश आलं.

पोलिसांनी हुन्सूर ग्रामीण पोलीस ठाण्यात याप्रकरणी अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. घटनेच्या नेमक्या परिस्थितीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. तपासाचा भाग म्हणून, स्नॅक्सच्या पाकिटात प्लास्टिकचे खेळणे कसे आले, याचा शोधही घेतला जाण्याची शक्यता आहे.

यापूर्वीही इथं घडलाय असाच प्रकार

अधिक आश्चर्याची गोष्ट म्हणजेच याच भागात अशाप्रकारे घशात काहीतरी अडकल्यामुळे मृत्यू झाल्याची ही दुसरी दुर्घटना आहे. या वर्षाच्या सुरुवातीलाच म्हैसूरमधील हुन्सूर तालुक्यातील दोड्डाहेज्जूर गावात राहणाऱ्या चिन्मय गौडा या साडेसहा महिन्यांच्या बाळाचा अशाच प्रकारे मृत्यू झाला होता. पूजेसाठी ठेवलेले वाळलेले जास्वंदाचे फूल घशात अडकल्याने या बाळाचा मृत्यू झाला होता. मिळालेल्या माहितीनुसार, बाळ आपल्या मोठ्या भावंडासोबत खेळत असताना त्याने घराच्या प्रवेशद्वारावर ठेवलेले वाळलेले फूल उचलले आणि त्याचा एक तुकडा तोंडात टाकला. भावंडाने तो तुकडा काढण्याचा प्रयत्न केला असता, बाळाने तो चुकून गिळला.

सुरुवातीला बाळाला प्रथमोपचारासाठी हनागोडू येथील रुग्णालयात नेण्यात आले आणि त्यानंतर पुढील उपचारांसाठी म्हैसूरमधील एका खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. बरेच वैद्यकीय प्रयत्न करूनही या बाळाचा मृत्यू झाला, ज्यामुळे कुटुंबाला मोठा मानसिक धक्का बसला होता. मुकुंदच्या मृत्यूने पुन्हा एकदा दोड्डाहेज्जूरमधील या बाळाच्या मृत्यूची आठवण अनेकांना झाली असून या चिमुकल्यांचं असं अचानक जाणं अनेकांना धक्का देणारं ठरलं आहे.

घटस्फोटाच्या २१ दिवसांनी उर्मिला कानेटकरची क्रिप्टिक पोस्ट; कुणाचंही नाव न घेता लिहिलंय, कर्मा...

मुंबई । प्रतिनिधी : सध्या इंडस्ट्रीत घटस्फोट घेण्याचा ट्रेंड आलाय, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. गेल्या काही महिन्यांत अनेक सेलिब्रिटींनी आपल्या संसाराचा 'दी एन्ड' केलाय. काही दिवसांपूर्वीच मराठी इंडस्ट्रीतलं पॉवर कपल वेगळं झालंय. प्रसिद्ध अभिनेता आदिनाथ कोठारे आणि ऊर्मिला कानेटकर यांनी घटस्फोट घेतला आहे. आदिनाथ आणि ऊर्मिला कानेटकर यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत घटस्फोट घेत असल्याचं जाहीर केलं. पण, आता घटस्फोटानंतर उर्मिलानं केलेल्या क्रिप्टीक पोस्टची सध्या चर्चा रंगली आहे.

आदिनाथ कोठारे आणि उर्मिला कानेटकर यांनी काही दिवसांपूर्वीच घटस्फोट घेत असल्याची घोषणा केली आहे. मराठी इंडस्ट्रीतल्या पॉवर कपलचा संसार मोडल्यानं अनेकांना धक्का बसला. अशातच घटस्फोटाच्या २१ दिवसांनी मराठी अभिनेत्री उर्मिला कानेटकर हिनं आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक क्रिप्टिक पोस्ट शेअर केलीय.

अभिनेत्री उर्मिला कानेटकर पोस्टमध्ये काय म्हणालीय?

उर्मिलानं आपल्या इन्स्टा स्टोरीवरच्या पोस्टवर लिहिलंय की, ''परिस्थिती हाताळण्याची कर्माची एक धक्कादायक अनब अनोखी पद्धत असते. तुम्हाला फक्त शांतपणे बसून ते पाहायचे असते...''

महत्त्वाची बाब म्हणजे, उर्मिला कानेटकरनं आपल्या इन्स्टा स्टोरीमध्ये कोणाचंही नाव घेतलेलं नाही, तसेच ना त्यांनी कोणत्याही घटनेचा उल्लेख केलाय. त्यामुळे

उर्मिला कानेटकरनं पोस्टमध्ये कोणाचंही नाव किंवा कोणत्याही घटनेचा थेट उल्लेख नसला तरी सोशल मीडियावर तिच्या या संदेशाचे अनेक अर्थ लावले जात आहेत. काही नेटकऱ्यांच्या मते, हा संदेश तिच्या वैयक्तिक आयुष्यातील अलीकडील घडामोडींशी संबंधित असू शकतो. मात्र, याबाबत उर्मिलानं कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नाही.

इंडस्ट्रीतील कधीकाळचं पॉवर कपल म्हणून ओळखले जाणारे मराठमोळी अमृता खानविलकर आणि तिचा पती अभिनेता हिमांशू मल्होत्रा घटस्फोटाच्या उंबरठ्यावर असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. दोघेही गेल्या १८ वर्षांपासून एकमेकांपासून विभक्त राहत असल्याचं बोललं जात आहे.

२० तास लैंगिक छळ... ठाण्यातील उच्चभ्रू कुटुंबातील मुलाचे हादरवणारे कृत्य; अल्पवयीन मैत्रिणीला रुममध्ये कोंडलं अनब

दैनिक आपला विदर्भ

नागपूर । प्रतिनिधी : नागपूरमध्ये एक हादरवणारी घटना समोर आली आहे. ठाण्यातील गर्भश्रीमंत कुटुंबातील तरुणाने हादरवून सोडणारे कृत्य केले आहे. सोशल मीडियावरील मैत्रीचा फायदा घेत एका तरुणीवर विकृत लैंगिक अत्याचार व बेदम मारहाण केल्याचे समोर आले आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

सोशल मीडियावर झालेली मैत्रीतून अल्पवयीन मुलीला हॉटेलमध्ये बोलवले त्यानंतर तिथे तिला बेदम मारहाण व लैंगिक छळ करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हा मुळचा ठाण्यातील असून तो नागपुरात आला होता. येथे त्याने त्याच्या इंस्टाग्राम फ्रेंड आणि गेमिंग पार्टनरने असलेल्या मैत्रिणीचा लैंगिक छळ आणि मारहाण केल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

धक्कादायक म्हणजे, आरोपीने १६ वर्षांच्या पिडीत तरुणीला बेदम मारहाण केली. तिच्या शरिरावर चाकूने वार केले तसंच, तिचे हात बांधून विकृत लैंगिक कृत्य करत तिचा अतोनात छळ केला. सलग २० तास तिला एका खोलीत डांबून ठेवत तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आले. इतकंच नव्हे तर तिला जीवे मारण्याची धमकी देत तिला शारिरीक व मानसिक त्रास दिला.

चार वर्षांपूर्वी पीडित तरुणी व आरोपीची ऑनलाइन गेमच्या माध्यमातून ओळखा झाली होती. आरोपी हा ठाण्याचा रहिवाशी असून त्याचे वय १९ वर्षे इतके आहे. त्यांची सोशल मीडियाच्या माध्यमातून मैत्री झाली होती. आरोपी हा ठाण्यातील एका सुखवस्तु कुटुंबातील असून तो एका सुप्रसिद्ध डॉक्टरचा मुलगा आणि महाराष्ट्रातील एका वरिष्ठ पोलिसाचा पुतण्या असल्याचे सांगितले जाते.

आरोपी तरुणाने आकाश मेहरा या खोट्या नावाखाली पीडित मुलीशा चॅटिंगद्वारे मैत्री केली होती. त्यानंतर एका वर्षात तो दोनदा नागपूरला आला होता. त्यानंतर वेगवेगळे आमिष दाखवून तिचा विश्वास संपादन केला होता. पीडित तरुणी रविवारी सकाळी तिच्या मैत्रिणीच्या घरी जात असल्याचे सांगून घराबाहेर पडली होती. त्यानंतर आरोपीने तिला दिघोरीतील रुमवर नेले होते.

आरोपीने जीवे मारण्याची धमकी देऊन तिला डांबून ठेवत तिला भयावह

शारीरिक आणि मानसिक त्रास दिला. तिच्यावर अत्याचार केला. दरम्यान, २० तास उलटून देखील मुलगी परत न आल्याने तसेच तिचा फोन लागत नसल्याने तिच्या उच्चपदस्थ वडिलांनी हुडकेश्वर पोलिस ठाण्यात एफ आय आर दाखल केली होती.

तक्रार दाखल होताच पोलिसांनी तपास करत दिघोरीवरील त्या रुमवर धाड टाकली आणि तरुणीची सुटका केली. पोलिसांनी तिची सुटका केल्यानंतर सलंग दोन दिवस आरोपीकडून मिळालेल्या यातनांमुळे मुलगी मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या पुरती कोलमडली असल्याचे आढळले आहे. तिच्यावर उपचार सुरू असून, आरोपीविरुद्ध भारतीय न्यायसंहिता तसेच बालसंरक्षण कायद्यान्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याशी संबंधित इलेक्ट्रॉनिक पुरावे तसेच वैज्ञानिक पुरावे, डीएनए, फिंगर प्रिंट्स आणि इतर भौतिक पुरावे संकलित करण्याचे काम वेगाने सुरू आहे. आरोपीला न्यायालयात हजर करून दोन दिवसांचा पीसीआर मिळवला आहे

सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना १० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याची संधी

▪ शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन
▪ जिल्ह्यासाठी बजाज जनरल इन्शुरन्स अधिकृत विमा कंपनी

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा । प्रतिनिधी खरीप हंगाम २०२६-२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना जिल्ह्यात लागू करण्यात आली असून, या वर्षासाठी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची अधिकृत विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, दुष्काळ तसेच कीड व रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळविण्यासाठी जिल्ह्यातील सर्व कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.

शेतकरी आपल्या जवळील कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी), महा-ई-सेवा केंद्र, बँक किंवा प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अधिकृत एनसीआयपी पोर्टलद्वारे पीक विम्यासाठी अर्ज करू शकतात. योजनेत सहभागी होण्यासाठी १० ऑगस्ट २०२६ ही अंतिम मुदत असून, त्यानंतर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. त्यामुळे अंतिम मुदतीची वाट न पाहता वेळेत विमा भरून आपल्या पिकांचे संरक्षण करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विमा भरण्याच्या प्रक्रियेत किंवा पिकांच्या नुकसानीची माहिती देताना अडचण आल्यास संबंधित तालुक्यातील बजाज जनरल इन्शुरन्स कंपनीच्या समन्वयकांशी अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर स्वतंत्र समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून, बुलढाणा जिल्ह्यासह सर्व तालुक्यांसाठी संपर्क अधिकारी उपलब्ध आहेत.

केंद्र शासनाच्या दि. ४ ऑगस्ट २०२६ च्या पत्रानुसार प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत १० ऑगस्ट २०२६ निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी विमा भरून नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून संरक्षण मिळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पीकनिहाय शेतकरी हिस्सा (प्रति हेक्टर) सोयाबीन ₹१ हजार २५०, कापूस ₹१ हजार ३००, तूर ₹ ९४०, मूग ₹ ७५, उडीद ₹ ६७.५०, मका ₹१०० याप्रमाणे आहे. प्रशासनाने सर्व पात्र शेतकऱ्यांनी वेळेत अर्ज करून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे.

वृत्तविशेष...

जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त जनजागृती कार्यक्रम उत्साहात

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा । प्रतिनिधी जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त संभाजीनगर, बुलढाणा येथील अंगणवाडी केंद्रात शहरी नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र कारंजा चौक बुलढाणा यांच्या वतीने माता व बाल आरोग्य जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी उपस्थित गर्भवती महिला, स्तनदा माता व कुटुंबीयांना स्तनपानाचे महत्त्व, योग्य पद्धतीने स्तनपान कसे करावे तसेच नवजात बालकाच्या सर्वांगीण शारीरिक व मानसिक विकासासाठी आईच्या दुधाचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमात डॉ. सुनीता बडगे यांनी स्तनपानासंदर्भातील विविध गैरसमज दूर करत जनजागृती केली. जन्मानंतर पहिल्या तासात नवजात बालकाला स्तनपान सुरू करणे, जन्मानंतर पहिले सहा महिने केवळ आईचे दूध देणे तसेच सहा महिन्यांनंतर पूरक आहारासह दोन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ स्तनपान सुरू ठेवण्याचे महत्त्व यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी अंगणवाडीमध्ये लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पूरक आहाराची पाहणी करून त्याच्या गुणवत्तेबाबत माहिती घेण्यात आली. तसेच माता व बालकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली

एकात्मिक डिजिटल डेटाचा प्रभावी वापर करावा – मुख्य सचिव राजेश अग्रवाल

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : शासनाकडे आधीच उपलब्ध असलेली माहिती नागरिकांकडून पुन्हा मागविण्याची गरज कमी करून 'महा सारथी'सह विविध एकात्मिक डिजिटल डेटाचा प्रभावी वापर करावा. अर्जाच्या टप्प्यावरच आवश्यक माहितीचे 'ऑटो फेच', डिजिटल पडताळणी आणि किमान कागदपत्रांच्या आधारे नागरिकांना योजनांचा लाभ मिळेल, यासाठी सर्व विभागांनी ठोस प्रयत्न करावेत, असे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सांगितले.

मुख्य सचिव कार्यालय व नियोजन विभागाच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालयात राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. प्रशासनात अधिक गतिमानता आणून लोकाभिमुखता वाढवावी असे निर्देशही त्यांनी दिले.

अपर मुख्य सचिव (पशुसंवर्धन) रामास्वामी यांनी शासन प्रक्रिया पुनर्रचना ही केवळ डिजिटल परिवर्तनाची प्रक्रिया नसून प्रशासनाची कार्यक्षमता वाढविणारे आणि नागरिकांचा शासनावरील विश्वास दृढ करणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. या राज्यव्यापी उपक्रमामुळे योजनांमधील अनावश्यक कागदपत्रे कमी होऊन मंजुरी प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होईल, तसेच नागरिकांना अधिक सुलभ आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

गडचिरोली जिल्ह्यातील लाभार्थी संतृप्ती अभियानादरम्यान झालेल्या प्रत्यक्ष क्षेत्रभेटींमध्ये नागरिकांना योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणींचे निरीक्षण करण्यात आले. अनावश्यक कागदपत्रांची मागणी, एकाच माहितीची वारंवार पडताळणी, क्लिष्ट अर्ज प्रक्रिया आणि तांत्रिक अडथळ्यांमुळे होणारा विलंब दूर करण्यासाठी राज्यातील सर्व योजनांचे पुनरावलोकन करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

वाकवली येथे नवीन शासकीय कृषी विज्ञान पदव्युत्तर संस्था स्थापनेचा प्रस्ताव तयार करा

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : कोकणातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर कृषी शिक्षण आणि अत्याधुनिक संशोधनाच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दापोली कृषी विद्यापीठांतर्गत रत्नागिरीतील वाकवली येथे नवीन शासकीय कृषी विज्ञान पदव्युत्तर संस्था उभारणे आवश्यक आहे. या संस्थेमुळे कृषी संशोधन, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि स्थानिक रोजगाराला चालना मिळेल. त्यामुळे याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तातडीने तयार करून शासनाकडे सादर करावा, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

रत्नागिरीतील वाकवली येथे नवीन शासकीय कृषी विज्ञान पदव्युत्तर संस्था स्थापन करण्याबाबत कृषिमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. बैठकीला राज्यमंत्री योगेश कदम, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली चे कुलसचिव डॉ. संजय भावे, उपसचिव प्रतिभा पाटील यासह कृषी विभागाचे अधिकारी उप सचिव उपस्थित होते.

अवयवदान पंधरवड्यानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालयात सामूहिक अवयवदान प्रतिज्ञा

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा । प्रतिनिधी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने साजऱ्या करण्यात येत असलेल्या अवयवदान पंधरवडा निमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील नेत्ररोग विभागात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामूहिक अवयवदान प्रतिज्ञा घेत समाजात अवयवदानाबाबत जनजागृतीचा संदेश दिला.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ रणजीत मंडाले यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित कार्यक्रमात अवयवदानाचे सामाजिक महत्त्व, मृत्यूनंतर अवयवदानातून अनेकांना नवजीवन मिळू शकते, तसेच नेत्रदानासह विविध अवयवदानाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याची गरज यावर मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अवयवदानाची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

याप्रसंगी नागरिकांनी अवयवदानाचा संकल्प करून गरजूंना जीवनदान देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. रवी शिंदे, डॉ. भिलावेकर, नोडल अधिकारी अविनाश चिंचोले, जि. वि. मा. अ. धुतडमल, नेत्रदान समुपदेशक योगेश सिरसाट, डॉ. तोडकर, सौरभ हिवाळे, सवडतकर तसेच नेत्ररोग विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडून आढावा

मुंबई । प्रतिनिधी : कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा आढावा पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत घेतला. या बैठकीस आमदार आशुतोष काळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव रंगा नायक, जल जीवन मिशनच्या सह अभियान संचालक दिपाली देशपांडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री पाटील म्हणाले, पाणीपुरवठा योजनांची प्रलंबित कामे मार्गी लावून नागरिकांना शाश्वत व दर्जेदार पिण्याच्या पाण्याचा लाभ मिळावा. ज्या योजनांची कामे पूर्ण झाली आहेत त्याचा आढावा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधितांकडून घ्यावा. ज्या योजनांचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव असतील ते प्राधान्याने पाठवावेत. ज्या योजनांचे काम मूळ अंदाजपत्रकानुसार पूर्ण झाले मात्र अतिरिक्त छोट्या रकमेची गरज आहे अशा पाणी पुरवठा योजनांच्या कामासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्धतेबाबत प्रयत्न व्हावेत. बैठकीत कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी, कुंभारी, मायगाव देवी, सुरेगाव, मळेगाव थडी, धारणगाव, रवंदे, रांजणगाव देशमुख, शिंगणापूर व वारी कान्हेगाव तसेच राहाता तालुक्यातील रुई-शिंगवे, पुणतांबा व नपावाडी येथील जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, कोकमठाण ता. कोपरगाव येथील पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी आवश्यक जागा संपादनासह मंजुरी देणे आणि माहेगाव देशमुख ता. कोपरगाव येथील जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या वाढीव प्रस्तावास मंजुरी देणे या विषयावर चर्चा करण्यात आली.

देवाच्या नावानं विश्वास संपादन केला अनब..., महिलेसोबत भयंकर प्रकार, त्र्यंबकेश्वरच्या दोघांवर बीडमध्ये गुन्हा

दैनिक आपला विदर्भ

बीड । प्रतिनिधी : इन्स्टाग्रामवर ओळख झाली. देव-देवतांच्या नावानं विश्वास संपादन केला. त्यानंतर आयुष्य उद्ध्वस्त करण्याची आणि पतीला जिवे मारण्याची भीती घालत एका गृहिणीसोबत भयंकर प्रकार घडला. बीडमधील महिलेकडून तब्बल १ लाख ३७ हजार रुपये उकळण्यात आले. या प्रकरणी त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथील दोन ठगांवर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड शहरातील आंबिका चौक परिसरात उषा खामकर (वय ३१) ही महिला कुटुंबीयांसह वास्तव्यास आहे. दीड महिन्यांपूर्वी 'श्री स्वामी समर्थ' नावाच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून सागर जोशी आणि जिगर गजानन जोशी या दोघांची तिची ओळख झाली. सुरुवातीला त्यांनी देव-देवतांबाबत धार्मिक माहिती दिली. महिलेचा विश्वास संपादन केला आणि त्यानंतर पैसे मागण्यास सुरुवात केली.

गृहिणीकडे वारंवार पैसे मागितले जात होते. 'पैसे दिले नाहीस तर तुझ्यावर जादूटोणा करेन, तुझं आयुष्य उद्ध्वस्त करीन आणि तुझ्या पतीला जिवे मारून तुझ्यावर भीक मागण्याची वेळ आणीन,' अशी भीती फोन करून घातली जात होती. त्यामुळे गृहिणी प्रचंड घाबरली होती. तिने याच भीतीने टप्प्याटप्प्याने १ लाख ३७ हजार रुपये त्यांना दिले.

दरम्यान, गृहिणीकडे सातत्याने पैसे मागितले जात होते. तिने नकार देताच आरोपींनी खरा चेहरा दाखवण्यास सुरुवात केली. तिला धमक्या देण्यात येत होत्या. सततच्या आर्थिक आणि मानसिक छळाला कंटाळून महिलेने थेट शिवाजीनगर पोलीस ठाणे गाठले. त्या ठिकाणी घडलेला घटनाक्रम सांगितला. यावरून सागर जोशी आणि जिगर जोशी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवाजीनगर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा । प्रतिनिधी शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत जिल्ह्यातील पात्र १ लाख १६ हजार ४३६ लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या प्राप्त झाल्या आहेत. या याद्या जिल्ह्यातील प्रत्येक गावचे ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, बँक शाखा तसेच सहाय्यक निबंधक कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. पात्र शेतकरी बांधवांनी त्वरित आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हास्तरीय कर्जमुक्ती समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या याद्यांमध्ये नाव असलेल्या पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी आपला फार्मर आयडी आणि आधार कार्ड सोबत घेऊन नजीकच्या ई-सेवा केंद्रावर जावून आधार प्रमाणीकरण त्वरित पूर्ण करणे आवश्यक आहे. शासनाने निश्चित केलेल्या मुदतीत सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच शेतकऱ्यांना या कर्जमुक्ती योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे.

१ लाख १६ हजार पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध

योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान काही अडचणी किंवा तक्रारी असल्यास शेतकऱ्यांना जिल्हास्तरीय अथवा तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीकडे ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने दाद मागता येणार आहे.

सदर कर्जमुक्ती योजनेचे कामकाज सहकार विभाग, महसूल विभाग आणि बँक प्रशासन यांच्यामार्फत एकत्रित व सुयोग्य प्रकारे केले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बँकांमध्ये विनाकारण गर्दी न करता प्रशासनास सहकार्य करावे. ज्या शेतकऱ्यांची नावे यादीत आली आहेत, त्यांनी विलंब न करता नजीकच्या ई-सेवा केंद्रात जाऊन आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी आणि शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाण यांनी केले आहे.

नायगाव देशमुख ग्रामस्थांचा संताप; दोन दशकांपासून रस्त्याच्या प्रतीक्षेत, ७ दिवसांत काम सुरू न झाल्यास आंदोलनाचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

मेहकर । प्रतिनिधी मेहकर तालुक्यातील नायगाव देशमुख येथील ग्रामस्थ गेल्या दोन दशकांपासून दर्जेदार रस्त्याच्या प्रतीक्षेत असून, जीर्ण झालेल्या रस्त्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत सन २००४०५ मध्ये बांधण्यात आलेला हा रस्ता आज पूर्णपणे खराब झाला असून, ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनचालक, शेतकरी, विद्यार्थी आणि रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था लक्षात घेता ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने तांत्रिक पाहणी करून रस्त्याचे नूतनीकरण, डांबरीकरण तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. अनेक वेळा पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याची नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, या मागण्यांकडे सात दिवसांच्या आत गांभीर्याने लक्ष देऊन काम सुरू करण्यात आले नाही, तर भारतीय संविधानाच्या चौकटीत राहून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे.

दोन दशकांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत.